| | | | |
|---|---|---|---|
| CNR No. **MHGO**050002592018 | **कालावधी** | | |
| | वर्ष | महिने | दिवस |
| | ०७ | ०८ | १८ |

## न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी, सडक अर्जुनी, जि. गोंदिया यांचे न्यायालयात
## (पीठासीन अधिकारी पी. एम. काजळे)

**नि. फौ. ख. क्र. २५/२०१८**
**निशाणी क्र. ६३/ब**
**प्रथम खबर क्र. १६/२०१८**
**तालुका पोलीस ठाणे, डुग्गीपार**

| | | |
|---|---|---|
| **सरकार पक्ष** | ]<br>]<br>]<br>] | महाराष्ट्र शासनमार्फत,<br>पोलीस स्टेशन अधिकारी,<br>पोलीस स्टेशन, डुग्गीपार, ता. सडक अर्जुनी,<br>जि. गोंदिया. |
| **प्रतिनिधित्व** | ] | सहा.सरकारी अभियोक्ता श्री. ओ. एस. गहाणे |
| | *–वि रु ध्द–* | |
| **आरोपीं** | ]<br>]<br>]<br>]<br>]<br>]<br>] | **१. संजय ताराचंद सोनवाने (मयत)**<br>**२. प्रमोद ताराचंद सोनवाने,**<br>वय– ३४ वर्षे, व्यवसाय– मजुरी,<br>**३. कमलाबाई ताराचंद सोनवाने,**<br>वय– ७२ वर्षे, व्यवसाय– मजुरी,<br>सर्व राहणार– डव्वा, ता. सडक अर्जुनी,<br>जि. गोंदिया. |
| **प्रतिनिधित्व** | ] | विधिज्ञ श्री. एस. एस. वालदे |

| | | | |
|---|---|---|---|
| १) | गुन्हा घडल्याची तारीख | :– | २६.०१.२०१८ |
| २) | प्रथम खबर अहवाल तारीख | :– | २७.०१.२०१८ |
| ३) | दोषारोप पत्र दाखल तारीख | :– | २९.०६.२०१८ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४) | दोषारोप/प्रतिकथन ठेवल्याची तारीख | :– | १३.०८.२०१८ |
| ५) | साक्षीपुरावा सुरु झाल्याची तारीख | :– | २६.०९.२०१८ |
| ६) | न्यायनिर्णयासाठी राखून ठेवलेली तारीख | :– | ......... |
| ७) | न्यायनिर्णयाची तारीख | :– | १८.०३.२०२६ |
| ८) | शिक्षा देणेची तारीख, जर असल्यास | :– | निरंक |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर मुक्त दिनांक | ठेवण्यात आलेल्या दोषारोपाची कलमे | निर्दोष किंवा दोषी | शिक्षेचे वर्णन | फौ.प्र.सं. कलम ४२८ करिता कारागृह कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २) | प्रमोद ताराचंद सोनवाने, | ३०.०१.२०१८ | ३१.०१.२०१८ | भा. दं. वि. चे कलम ४५२, ३२४, ५०६, ५०९ सह ३४ प्रमाणे. | निर्दोष | निरंक | -- |
| ३) | कमलाबाई ताराचंद सोनवाने, | ३१.०१.२०१८ | ३१.०१.२०१८ | | | | |

## सरकार पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयातर्फे साक्षीदारांची यादी

### अ) सरकार पक्ष :–

| साक्षीदार क्र. | साक्षीदाराचे नांव | साक्षीदाराची वर्गवारी | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १) | भोजराज झिंगर गावराने | पंच | ०८ |
| २) | सोभीलाल भोजराज लटये | साक्षदार | ३१ |
| ३) | प्रितमलाल जगन्नाथ पटले | पंच | ३५ |
| ४) | मेघनाथ सखाराम उंदिरवाडे | तक्रारकर्ता | ३७–अ |
| ५) | रजनी अमोल कोटांगले | साक्षदार | ४६ |
| ६) | शुभांगी मेघनाथ उंदिरवाडे | साक्षदार | ४७ |

| | | | |
|---|---|---|---|
| ७) | सुनंदाताई मेघनाथ उंदिरवाडे | साक्षदार | ५२ |
| ८) | सुरेश राजकुमार चंद्रिकापुरे | तपास अधिकारी | ५४ |

**ब) <u>बचाव पक्षाचे साक्षीदार, असल्यास</u> :– निरंक.**

**क) <u>न्यायालयाचे साक्षीदार, असल्यास</u> :– निरंक.**

**<u>सरकार पक्ष/बचाव पक्ष/न्यायालया तर्फे दस्तऐवजांना निशाणी देण्यात आलेली यादी</u>**

**अ) <u>सरकार पक्ष</u> :–**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **दस्तऐवजाचे विवरण** | **दस्तऐवजास निशाणी देण्यात आलेल्या साक्षीदाराचा क्रमांक** |
|---|---|---|---|
| १) | ०९ | घटनास्थळ पंचनामा | स.सा.क्र. १ |
| २) | ३८ व ३९ | तोंडी रिपोर्ट, प्रिटेंड एफ.आय.आर. व एक बांबुची काठी आर्टीकल – अ वर व एक सागवानाची काठी आर्टीकल – ब वर. | स.सा.क्र. ४ |
| ३) | ३८, ९, १०, ५५ ते ५७ | रिपोर्ट, घटनास्थळ पंचनामा, जप्ती पंचनामा, आरोपी क्र. १ ते ३ यांचे अटक फॉर्म. | स.सा.क्र. ८ |

**ब) <u>बचाव पक्ष</u> :– निरंक.**

**क) <u>न्यायालयातर्फे निशाणी</u> :– निरंक.**

**ड) <u>जप्त मुद्देमाल / वस्तु वर्णन</u>:–** मुद्देमाल क्र. ७३/२०१८ एक आडजातीची काठी व एक बांबुची काठी.

## न्या य नि र्ण य  व  आ दे श

**(दिनांक १८ मार्च २०२६ रोजी पारीत)**

आरोपींविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ४५२, ३२४, ५०६, ५०९ सह ३४ प्रमाणे खटला चालला आहे.

**अभियोग पक्षाचे प्रकरणाची थोडक्यात हकीकत खालील प्रमाणे –**

**०२]** दिनांक २६.०१.२०१८ रोजी तक्रारदार मेघनाथ सखाराम उंदिरवाडे गोपालटोली येथुन त्याच्या पत्नीला सायंकाळी ०५:०० वाजता घरी सोडुन तो बाहेर गेला होता. त्यादिवशी सायंकाळी ०७:३० वाजता तो घरी आला त्यावेळी आरोपी हे तक्रारदारच्या पत्नीला व मेव्हुणीला भोसळाचोदी, रोडावर ये, तुमच्यावर बसतो, मादरचोद साली अशी शिवीगाळ करत होते. त्यावेळी त्याने पत्नीला आरोपी शिवीगाळ का करत आहे याबाबत विचारले असता त्याच्या पत्नीने सांगितले की, आरोपींच्या गाईचा वासरू आपल्या वाडीमध्ये आला होता. त्यावेळी ती आरोपी कमलाबाई सोनवाने हिला म्हणाले की, वासरू बांधुन का नाही ठेवत, आमचे वाडीत येवुन तुर खात होता, चांगले झाले आमचे हमालाने सांगितले नाहीतर पुर्ण तुर खाउन टाकली असती. त्यावेळी कमलाबाई हिने तक्रारदारच्या पत्नीला शिवीगाळ केली. त्यावर तक्रारदारची पत्नी शिवीगाळ का करता, तुमचे वासरू बांधुन ठेवत जा असे म्हणाले. तरीही आरोपी शिवीगाळ करत होते. त्यानंतर तक्रारदार याने आरोपींना वाईट शिवीगाळ का करतात असे हटकले असता, आरोपींनी काठी हातात घेवुन त्याला मारण्यास धावले. तक्रारदारची पत्नी व मेव्हुणी भांडण सोडविण्यासाठी आले. त्यावेळी आरोपी कमलाबाईने त्याची पत्नीचे केस पकडुन खाली पाडले. तसेच आरोपी संजय सोनवाने व प्रमोद सोनवाने या दोघांनी तक्रारदारला काठीने मारहाण करून म्हणाले की, साल्या मादरचोदा, तुझ्या बायकोला हेपो, पुन्हा जास्त केलातर जिवाने मारीन अशी धमकी देवुन त्यांच्यावर दगड फेक करून घरी निघुन गेले. घटनेमुळे तक्रारदारच्या हाताला, मेव्हुणीच्या डाव्या हाताला व पत्नीला डाव्या खांदयावर मार लागला. त्यामुळे तक्रारदाराने आरोपी क्र. १ ते ३ विरूध्द तक्रार दिली होती. सदर तक्रारवरून तालुका पोलीस ठाणे, डुग्गीपार येथे गु.र.नं. १६/२०१८ भारतीय दंड विधान कायदा कलम ४५२, ३२४, ५०६, ५०९ सह ३४ अन्वये दाखल झाला होता.

०३] सदर गुन्हयाचा तपास पो.ना/चंद्रीकापुरे याचेकडे सोपविण्यात आला. तपास दरम्यान त्याने तक्रारदार व साक्षीदारांना वैद्यकीय तपासणीकरिता पाठविले. आरोपींना अटक केले. पंचासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला, जप्ती पंचनामा केला. जखमींचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले. साक्षीदारांचे जाब–जबाब नोंदविले व संपूर्ण तपासाअंती आरोपींविरुद्ध सबळ पुरावा मिळून आल्याने न्यायालयात दोषारोपपत्र सदर केले.

०४] सदर प्रकरण हे फौजदारी प्रक्रिया संहितेचे चाप्टर १९ प्रमाणे नियमित फौजदारी खटल्याचे प्रक्रियेप्रमाणे चालविणेत आले असून, त्यानुसार आरोपीविरुद्ध निशाणी ०३ नुसार भारतीय दंड संहिता कलम ४५२, ३२४, ५०६, ५०९ सह ३४ अन्वये शिक्षेसपात्र गुन्हयाचा दोषारोप फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४० नुसार ठेवण्यात आला. त्यातील मजकूर आरोपींना मातृभाषेत वाचून व समजावून सांगितला असता, आरोपींनी त्यांचेवरील आरोप नाकारले व संपरीक्षेस सामोरे जाण्याचे प्रतिपादन केले. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४२ नुसार सरकार पक्षाने साक्षीदार तपासले. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ (१)(ब) आरोपींना त्यांच्याविरुद्ध असणाऱ्या परिस्थिती विशेषांचा खुलासा करणे शक्य व्हावे, यासाठी सर्वसाधारण प्रश्न विचारण्याची गरज आहे. सदर साक्षीदारांचे पुराव्यामध्ये आरोपींविरुद्ध सबळ परिस्थितीजन्य पुरावा अभिलेखावर आलेला आहे. त्यामुळे आरोपी क्र. २ व ३ यांना त्यांच्या विरुद्ध दिसणाऱ्या परिस्थिती विशेषाच्या बाबत सर्वसाधारण प्रश्न निशाणी क्र. ५९ व ६० प्रमाणे विचारण्यात आले. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४३ प्रमाणे आरोपी क्र. २ व ३ यांनी त्यांच्या बचावात साक्षीपुरावा दिला नाही. आरोपींचा बचाव असा आहे की, त्यांना प्रस्तुत प्रकरणात खोटे गोवले. आरोपी क्र. १ हा केस प्रलंबित असतांना मयत झालेला आहे. त्यामुळे प्रस्तुतची केस दिनांक १२.१०.२०२० रोजी अबेट करण्यात आली आहे.

०५] अभियोग पक्षातर्फे श्री. ओ. एस. गहाणे, सहाय्यक अभियोक्ता व आरोपींतर्फे श्री एस. एस. वालदे यांचा युक्तिवाद ऐकला. पटलावारील कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रस्तुत प्रकरणाचे निर्णयाप्रत पोहोचण्याकरीता खालील मुद्दे माझे विचारार्थ उपस्थीत झाले असून त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह त्यापुढे नोंदवीत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोग पक्षाने हे सिद्ध केले आहे काय की, दिनांक २६/०१/२०१८ रोजी सायंकाळी ०७:३० वाजेच्या सुमारास मौजे डव्वा, ता. सडक अर्जुनी, जि. गोंदिया येथे आरोपींनी त्यांचा समान उद्देश साध्य करण्याच्या उद्देशाने तक्रारदार मेघनाथ सखाराम उंदिरवाडे याच्या घरात त्याला दुखापत करण्याच्या उददे्शाने आतमध्ये प्रवेश केला व त्याप्रमाणे भारतीय दंड संहिता कलम ४५२ सह ३४ अन्वये शिक्षापात्र अपराध केला? | नाही. |
| २ | अभियोग पक्षाने हे सिद्ध केले आहे काय की, उपरोक्त तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी त्यांचा समान उद्देश साध्य करण्याच्या उद्देशाने तक्रारदार, तक्रारदारची पत्नी व मेव्हुणी यांना लाकडी काठीने मारहाण करून दुखापत केली व भारतीय दंड संहिता कलम ३२४ सह ३४ अन्वये शिक्षापात्र अपराध केला? | नाही. |
| ३ | अभियोग पक्षाने हे सिद्ध केले आहे काय की, उपरोक्त तारीख, वेळी आरोपींनी त्यांचा समान उद्देश साध्य करण्याच्या उद्देशाने आरोपींनी तक्रारदार, त्याची पत्नी व मेव्हुणी यांना मारहाण करण्याची धमकी दिली व भारतीय दंड संहिता कलम ५०६ सह ३४ प्रमाणे शिक्षापात्र अपराध केला? | नाही. |
| ४ | अभियोग पक्षाने हे सिद्ध केले आहे काय की, उपरोक्त तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी त्यांचा समान उद्देश साध्य करण्याच्या उद्देशाने आरोपींनी तक्रारदारची पत्नी व मेव्हुणी यांचा विनयशिलतेचा अपमान करण्याच्या उद्देशाने अश्लील शब्दोचार केला व त्याप्रमाणे भारतीय दंड संहिता कलम ५०९ सह ३४ अन्वये शिक्षापात्र अपराध केला? | नाही. |
| ५ | आदेश काय? | आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमीमांसा

**मुद्दा क्रमांक १ ते ४ करिताः–**

०६] अभियोग पक्षातर्फे सादर करण्यात आलेला एकंदर पुरावा व आरोपी तर्फे उपस्थित करण्यात आलेला बचाव याचा विचार करता असे दिसून येते की, आरोपींनी तक्रारदारच्या घरात बेकायदेशीररितीने गुन्हा करण्याचा उद्देशाने जावुन त्याच्या पत्नीला व मेव्हुणीला अश्लील भाषेत शिवीगाळ करून त्यांचा विनयशिलतेचा अपमान करण्याच्या उद्देशाने अश्लील शब्दोचार केला व तक्रारदारला व साक्षीदारांना काठीने मारहाण केली, हि बाब अभियोग पक्षातर्फे सिद्ध करण्यात आली आहे किवा कसे हे पाहणे आवश्यक आहे.

०७] अभियोग पक्षातर्फे साक्षीदार (अ.सा.क्र.४) मेघनाथ उंदिरवाडे (तक्रारदार) याची साक्ष नोंदविले आहे. त्याने त्याच्या साक्षेमध्ये कथन केले आहे की, दिनांक २६.०१.२०१८ रोजी मौजे डव्वा येथील राहत्या घरी सायंकाळी ०७:३० ते ०८:०० वाजेच्या दरम्यान त्याची पत्नी सुनंदा उंदिरवाडे ही ध्वजारोहणा करिता गेली होती. ध्वजारोहणानंतर ती घरी आली. त्यावेळी त्यांचे वाडीतील तुर व भाजीपाल्याची नुकसान आरोपींची गाय करत असल्यामुळे ती आरोपींना गायी म्हशी बांधुन ठेवा असे म्हणाली असता, आरोपींनी त्याला व त्याच्या पत्नीला ''साली मादरचोद'' अशी शिवीगाळ केली. त्यांच्या आंगणात दगड फेकले. काठीने त्याच्या पत्नीला, त्याला व मेव्हुणीला मारहाण केली. त्यामुळे त्याने पोलीस ठाण्यात आरोपींविरूध्द तक्रार दिली. प्रस्तुत साक्षीदार हा स्वत: त्याचे साक्षमध्ये सांगतो की, आरोपींनी सदर घटनेबाबत तक्रारदार व त्याचे कुटुंबाविरूध्द गुन्हा दाखल केला होता. तसेच त्याने त्याचे उलटतपासामध्ये देखील कबुल केले आहे की, त्याच्या कोणत्या हाताला मार लागला होता हे त्याला सांगता आलेले नाही. प्रस्तुत साक्षीदाराने त्याचे तक्रारमध्ये आरोपींनी त्याची पत्नी व मेव्हुणीला साल्या मादरचोदा, तुझ्या बायकोला हेपो असे अश्लील शब्द वापरल्याचे सांगतो. परंतु, त्याने त्याच्या साक्ष पुराव्यामध्ये सदरचे अश्लील शब्द सांगितलेले नाही. तसेच सदरचे अश्लील शब्द हे कोणत्या आरोपीने उच्चारले होते हे त्याने सांगितलेले नाही. तसेच आरोपींनी अश्लील शब्द हेतुपुरस्पर त्याची पत्नी व मेहुनीला अपमानीत करण्याच्या उद्देशाने वापरले होते असे त्याचे साक्षेमधुन स्पष्ट झालेले नाही. आरोपींनी त्याच्या घरामध्ये बेकायदेशीररितीने गुन्हा करण्याचा उद्देशाने घुसले होते हे देखील तो सांगत नाही. आरोपींचा गुन्हा करण्याचा उद्देश होता हे त्याचे साक्षमधुन स्पष्ट होत नाही. तसेच त्याची मेहुनी

साक्षदार क्र. ५ रजनी कोटांगले, साक्षदार क्र. ६ शुभांगी उंदिरवाडे व पत्नी साक्षदार क्र. ७ सुनंदा उंदिरवाडे यांनी त्यांचे साक्षमध्ये आरोपींनी त्यांना अश्लील शब्दात अपमानीत करण्याचा प्रयत्न केला होता असे सांगत नाही. तसेच आरोपींनी त्यांना कोणत्या प्रकारचे अश्लील शब्द वापरले होते हे देखील तिनही महिला साक्षीदार यांनी त्यांचे साक्षमध्ये सांगितलेले नाही. त्यामुळे केवळ तक्रारदार याने त्याचे साक्षमध्ये ''साली मादरचोद'' असे अश्लील शब्द आरोपींनी वापरले होते असे जरी सांगितले असले तरीही त्याचे सदरच्या या कथनाला स्वत: पिडीत असलेल्या साक्षीदार क्र. ५, ६ व ७ या महिला साक्षीदारांनी दुजोरा दिलेला नाही. भारतीय दंड संहिताचे कलम ५०९ प्रमाणे आरोपींना दोषी ठरविण्यासाठी महिलेच्या लज्जेला धक्का पोहचविण्याचा उद्देश असावा, तसेच महिलेला अश्लील शब्दात उच्चारलेले असावे, महिलेच्या खाजगीपणात हस्तक्षेप केलेला असावा, तसेच सदर अश्लील शब्द हे त्या विशिष्ट महिलेकडे उद्देशुन केलेले असावे. प्रस्तुत प्रकरणात प्रस्तुत साक्षीदाराने साली मादरचोद हे शब्द साक्षमध्ये कथीत केलेले असले तरी सदरचे शब्द कोणत्या आरोपीने उच्चारले होते हे स्पष्ट सांगितलेले नाही. सदर शब्द हे त्याची पत्नी, मेव्हुणी यांच्या लज्जेला धक्का पोहचविण्याचा उद्देशाने वापरले होते हे त्याचे साक्षमधुन स्पष्ट होत नाही. स्वत: त्या महीलांनी त्यांच्या साक्षमध्ये सदरचे अश्लील शब्द सांगितलेले नाही. तसेच कोणत्या आरोपींनी साली मादरचोद हा शब्द उच्चारला त्याचे स्पष्ट नाव प्रस्तुत साक्षीदाराने सांगितलेले नाही. कोणत्या आरोपींनी कश्या प्रकारची कृती केली अथवा कोणत्या आरोपींनी कशाच्या सहाय्याने मारहाण केली हे सांगिलेले नाही. तसेच एक महत्वाची गोष्ट म्हणजे स्वत: तक्रारदार याने कबुल केले आहे की, आरोपींनी त्याचेविरूध्द पोलीस ठाण्यात प्रस्तुत घटनेबाबत तक्रार दिली होती, यावरून प्रस्तुत तक्रारदार हा केवळ आरोपींनी त्याच्याविरूध्द दिलेल्या तक्रारीला शह देण्याकरिता प्रस्तुतची तक्रार दिलेली असावी असा निष्कर्ष देखील निघतो. प्रस्तुत साक्षीदाराने त्याला शरिरावर कोणत्या ठिकाणी कशा प्रकारची दुखापती केली हे देखील सांगितलेले नाही. त्याने दुखापती झाल्यानंतर दवाखान्यात उपचार घेतले होते किंवा कसे याबाबत देखील कोणतीही स्पष्टता देत नाही. केवळ बांबुच्या व सागवनाच्या काठीने मारहाण केली होती व त्या काठया त्याने न्यायालयात ओळखल्या यावरून त्याला त्याच काठीने मारहाण झाली होती असा निष्कर्ष काढता येत नाही. त्याचे जखमांमधुन रक्त आले होते किंवा कसे तसेच त्याचे रक्ताने भरलेले कपडे जप्त करण्यात आले होते याबाबत देखील तो काहीही सांगत नाही. केवळ मारहाण झाली व शिवीगाळ केली यावरून आरोपींना दोषी धरता येत नाही. आरोपींना दोषी धरण्याकरिता अभिलेखावर ठोस पुरावा येणे गरजेचे आहे. तसेच त्या ठोस पुराव्याला इतर साक्षीदाराने दुजोरा देणे गरजेचे आहे. परंतु, प्रस्तुत साक्षीदार/तक्रारदारच्या कथनाला दुजोरा देणारा

स्वतंत्र साक्षीदार नाही. तसेच पिडीत महिलांनी देखील त्याचे अश्लील शब्दाला दुजोरा दिलेला नाही. त्यामुळे प्रस्तुत साक्षीदाराची साक्ष ही आरोपींना दोषी धरण्याइतपत पुरेशी नाही.

०८] अभियोग पक्षातर्फे साक्षीदार (अ.सा.क्र.५) रजनी कोटांगले ही घटनेची पिडीत साक्षीदार आहे. तिने तिच्या साक्षेमध्ये कथन केले आहे की, आरोपींच्या गायीने तक्रारदारच्या शेतीमालाचे नुकसान केले होते. त्यावरून आरोपीं व त्यांच्यामध्ये भांडण झाले होते. त्यामुळे आरोपींनी तिला, तक्रारदार व सुनंदा उंदिरवाडे यांना काठीने मारहाण केली होती. परंतु, तिचे साक्षमध्ये ती कुठेही तिला अथवा सुनंदा उंदिरवाडे हिला आरोपींनी अश्लील भाषेत शिवीगाळ अथवा अश्लील शब्द उच्चारून त्याचे लज्जेला धक्का पोहचेल अशी वर्तणुक केली असे सांगत नाही. तसेच तिने तिचे साक्षमध्ये आरोपींनी तिच्या घरामध्ये घुसुन तिला त्यानंतर मारहाण केली होती असे ती सांगत नाही. तिला आरोपींनी तिच्या शरिरावर कुठे मारहाण केली व तिला कशा प्रकारच्या दुखापती झाल्या हे ती सांगत नाही. तिचे उलटतपासामध्ये कबुल केले आहे की, तक्रारदार व आरोपींचे पुर्वीपासुन वाद आहे. यावरून तक्रारदार व साक्षीदार सुनंदा उंदिरवाडे हे आरोपींविरूध्द पुर्ववैमनस्यातुन प्रस्तुतची तक्रार दिलेली असावी असा देखील संशय निर्माण होतो. तसेच तिने तिचे साक्षमध्ये सांगितले आहे की, तक्रारदार व त्याची पत्नी संनुदा यांना जखम झाली होती. परंतु, तिने तक्रारदार व सुनंदा यांना शरिराच्या कोणत्या भागावर जखम झाली होती हे सांगितलेले नाही. त्यांनी दवाखान्यात उपचार घेतला होता याबाबत देखील ती सांगत नाही. प्रस्तुत साक्षीदार हे तक्रारदारचे सख्खी मेव्हुणी आहे. त्यामुळे सदर साक्षीदार ही हितसंबंधी साक्षीदार असल्याचे देखील दिसुन येते. त्यामुळे प्रस्तुत साक्षीदाराची साक्ष ही आरोपींना दोषी धरण्याइतपत पुरेशी नाही.

०९] अभियोग पक्षातर्फे साक्षीदार (अ.सा.क्र.६) शुभांगी उंदिरवाडे ही घटनेची साक्षीदार आहे. प्रस्तुत साक्षीदार ही तक्रारदारची मुलगी आहे. तिने तिच्या साक्षेमध्ये कथन केले आहे की, आरोपींच्या गायीने त्यांच्या शेतीमालाचे नुकसान केले होते. त्यावरून आरोपीं व त्यांच्यामध्ये भांडण झाले होते, म्हणुन आरोपींनी तिची आई, तक्रारदार/वडील व मावशी यांना काठीने मारहाण केली होती. त्यामुळे तिचे आई–वडीलांना जखम झाली होती. तसेच अश्लील शब्द भाषेत शिवीगाळ केली होती असे तिने सांगितलेले आहे. आरोपींनी कोणते अश्लील शब्द वापरले होते हे ती तिचे साक्षमध्ये सांगत नाही. तसेच तिचे आई–वडीलांना कोणत्या ठिकाणी कश्या प्रकारचे जखमा झाल्या होत्या हे देखील ती सांगत नाही. याउलट तिने तिचे उलटतपासात मान्य केले आहे की, त्यांच्यामध्ये व आरोपींमध्ये पुर्वीपासुन वाद आहे. यावरून तिचे वडीलांनी आरोपींविरूध्द पुर्ववैमनस्यातुन प्रस्तुतची

तक्रार दिलेली असावी असा देखील संशय निर्माण होतो. त्यांनी दवाखान्यात उपचार घेतला होता याबाबत देखील ती सांगत नाही. प्रस्तुत साक्षीदार ही तक्रारदारची मुलगी आहे. त्यामुळे सदर साक्षीदार ही हितसंबंधी साक्षीदार असल्याचे देखील दिसुन येते. त्यामुळे प्रस्तुत साक्षीदाराची साक्ष ही आरोपींना दोषी धरण्याइतपत पुरेशी नाही.

१०] अभियोग पक्षातर्फे साक्षीदार (अ.सा.क्र.७) सुनंदा उंदिरवाडे ही घटनेची पिडीत व तक्रारदारची पत्नी आहे. तिने तिच्या साक्षेमध्ये कथन केले आहे की, आरोपींच्या गायीने त्यांच्या शेतीमालाचे/तुरीचे नुकसान केले होते. त्यावरून आरोपीं व तिच्यामध्ये भांडण झाले होते. त्यामुळे आरोपींनी तिला, तिचे पती/तक्रारदार व बहीण रजनी यांना काठीने मारहाण केली होती. बहीणीचे व तिचे केस धरून ओढले. त्यामुळे तिचे पतीने पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती, परंतु ती तिच्या साक्षेमध्ये तिला, तिच्या बहीणीला अथवा मुलीला आरोपींनी अश्लील शब्दात शिवीगाळ केली, त्यामुळे त्यांच्या लज्जेला धक्का पोहचला असे सांगत नाही. तसेच तिला व तिच्या पतीला काठीने मारहाण झाल्यामुळे दुखापत झाली होती हे देखील सांगत नाही. त्याउलट साक्षीदार क्र. ५ व ६ हे प्रस्तुत साक्षीदाराला दुखापत झाल्याचे साक्षमध्ये सांगतात. स्वत: पिडीत साक्षीदार दुखापत झाल्याचे कुठेही सांगत नाही. यावरून साक्षीदारांच्या साक्षेमध्ये सुसंगती असल्याचे दिसुन येत नाही. आणखी एक महत्वाचे तथ्य म्हणजे आरोपी व प्रस्तुत साक्षीदार यांच्यामध्ये पुर्वीपासुन वाद आहे. तसेच आरोपींनी त्याचेविरूध्द पोलीस ठाण्यात तक्रार दिलेली होती. यावरून प्रस्तुत साक्षीदाराने व तिच्या पतीने सदर प्रकरणाला शह देण्याकरिता प्रस्तुतचे प्रकरण दाखल केलेले असावे असा संशय बळावतो. त्यामुळे केवळ मारहाण झाली व शिवीगाळ केली यावरून आरोपींविरूध्द गुन्हा सिध्द झाला असे म्हणता येणार नाही. आरोपींनी केलेल्या गुन्हयाला सुस्पष्टपणे व पुराव्याअंशी न्यायालयामध्ये शाबीत करणे गरजेचे आहे. परंतु, प्रस्तुत प्रकरणामध्ये सरकार पक्षाने कथन केलेल्या घटनाक्रम प्रस्तुत साक्षीदाराच्या साक्षेमध्ये अभिलेखावर तंतोतंत आल्याचे म्हणता येणार नाही. त्यामुळे प्रस्तुत साक्षीदाराची साक्ष ही आरोपींना दोषी धरण्याइतपत पुरेशी नाही.

११] अभियोग पक्षातर्फे साक्षीदार (अ.सा.क्र.१) भोजराज झिंगर गावराने व साक्षीदार (अ.सा.क्र.३) प्रितमलाल जगन्नाथ पटले हे दोन्ही साक्षीदार घटनेचे व जप्तीचे पंच साक्षीदार आहेत. परंतु, दोन्ही पंच साक्षीदारांनी त्याच्यासमक्ष कोणतीही हत्यार पोलीसांनी जप्त केलेले नसल्याचे ते सांगतात. त्यांनी केवळ पंचनाम्यावर सही केली होती. परंतु, सदर पंचनामे कश्याबाबतचे होते हे त्यांना माहीत नसल्याचे ते सांगतात. जप्ती पंचानी सरकार पक्षाला सहकार्य केलेले नसल्यामुळे

गुन्हयातील जप्त काठया हया त्याच गुन्हयातील होत्या यावर संशय निर्माण होतो. अभियोग पक्षाने दोन्ही साक्षीदारांचा उलटतपास नोंदविला, परंतु आरोपींना दोषी धरण्याइतपत पुरावा दोन्ही साक्षीदारांचा साक्षमधुन अभिलेखावर आलेला नाही. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार (अ.सा.क्र.२) शोभीलाल लटये याने देखील अभियोग पक्षाला सहकार्य केलेले नाही. त्याने त्याच्यासमक्ष कोणतीही घटना घडल्याचे सांगितलेले नाही. त्याला घटनेबाबत काहीही माहीत नसल्याचे तो सांगतो. त्यामुळे आरोपींनी तक्रारदारला कोणत्या शब्दात शिवीगाळ केली. तसेच कशा प्रकारे व कशाच्या सहाय्याने माहराण केली याबाबत सबळ पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे प्रस्तुत साक्षीदारांची साक्ष आरोपींना दोषी धरण्याइतपत पुरेशी नाही.

**१२]** अभियोग पक्षातर्फे प्रस्तुत खटल्यातील तपास अधिकारी साक्षीदार पो. हवा. चंद्रिकापुरे (अ.सा.क्र.८) याने त्याच्या साक्षीमध्ये असे सांगितले आहे की, दिनांक २७/०१/२०१८ रोजी प्रस्तुत गुन्हयाचा तपास त्याचेकडे सोपवण्यात आला होता. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदाराचे जाब–जबाब नोंदविले. घटनास्थळांचा पंचनामा केला. मुद्देमाल जप्त करून त्याचा पंचनामा केला. जखमींचे वैदयकीय प्रमाणपत्र हस्तगत केले. तपासाअंती आरोपीविरुद्ध सबळ पुरावा मिळून आला म्हणून दोषारोपपत्र दाखल केले. एवढ्या पुरतीच मर्यादित आहे. प्रस्तुत तपासी अधिकारी याच्या साक्षमधुन तक्रारदारला कशा प्रकारची मारहाण व शिवीगाळ करण्यात आली होती हे स्पष्ट झालेले नाही. तपासी अधिका–याने प्रस्तुत प्रकरणात स्वतंत्र साक्षीदाराचे जबाब नोंदविलेले नाही. तसेच गुन्हयात वापरण्यात आलेल्या काठया सारख्या अनेक काठया खेडे गावामध्ये सहज उपलब्ध होतात. जरी तक्रारदाराने सदर काठया न्यायालयासमोर ओळखल्या असल्या तरीही आरोपींनी जप्त काठीनेच मारहाण केली होती असा निष्कर्ष काढण्याइतपत पुरावा अभिलेखावर आल्याचे म्हणता येणार नाही. तक्रारदार याला दुखापत झाल्यानंतर त्याने वैद्यकीय अधिकारी यांच्याकडे उपचार घेतले याकरिता पोलीस ठाण्यातुन त्यांना मेमो देण्यात आला होता किंवा कसे याबाबत देखील प्रस्तुत साक्षीदार सांगत नाही. तक्रारदार व इतर कथित दुखापतींचे कोणतेही वैद्यकीय प्रमाणपत्र अभिलेखावर शाबीत झालेले नाही. गुन्हयातील वापरण्यात आलेली काठी जप्त करण्यात आलेल्या पंच साक्षीदार यांनी अभियोग पक्षाला सहकार्य केलेले नाही. त्यामुळे तक्रारदाराच्या कथनाला दुजोरा प्राप्त होत नाही. त्यामुळे प्रस्तुत गुन्हा अभियोग पक्षाने आरोपींविरूध्द शाबित केला आहे असा निष्कर्ष काढता येत नाही.

**१३]** वरील प्रमाणे वस्तुस्थिती, परिस्थिती आणि घटना लक्षात घेता, तक्रारदार, साक्षीदार यांचे साक्षमध्ये सुसंगती दिसुन येत नाही. अभियोग पक्षातील प्रमुख साक्षीदार मेघनाथ उंदिरवाडे (अ.सा.क्र.४) यांनी मारहाण व शिवीगाळ झाल्याचे सांगितले असले, तरी त्यांच्या साक्षीत अनेक त्रुटी व विसंगती आढळतात. त्यांनी स्वतः कबुल केले आहे की, घटनेपूर्वी आरोपींनी त्यांच्या विरोधात तक्रार दाखल केली होती. त्यामुळे तक्रार ही प्रतिशोधाच्या भावनेतून दिली असावी, असा संशय निर्माण होतो. साक्षीदारास स्वतःला झालेल्या दुखापतीबाबत कोणतीही ठोस माहिती देता आलेली नाही. कोणत्या अवयवावर मार लागला, जखमेचे स्वरूप काय होते किंवा वैद्यकीय उपचार घेतले का, याबाबत स्पष्टता नाही. अश्लील शब्दांच्या संदर्भात, साक्षीदाराने तक्रारीत नमूद केलेले शब्द साक्षीत सांगितलेले नाहीत. तसेच ते शब्द महिलांच्या लज्जेला धक्का पोहोचविण्याच्या उद्देशाने वापरले होते, हे सिद्ध होत नाही. साक्षीदार (अ.सा.क्र.५) रजनी कोटांगले, साक्षीदार (अ.सा.क्र.६) शुभांगी उंदिरवाडे व साक्षीदार (अ.सा.क्र.७) सुनंदा उंदिरवाडे या तिन्ही महिला साक्षीदारांनी त्यांच्या साक्षीत आरोपींनी अश्लील शब्द वापरल्याचे स्पष्टपणे सांगितलेले नाही. त्यामुळे भारतीय दंड संहितेच्या कलम ५०९ अंतर्गत आवश्यक घटक सिद्ध होत नाहीत. तसेच, या साक्षीदारांनी जखमांचे स्वरूप, मारहाणीची पद्धत व वैद्यकीय उपचार याबाबतही ठोस माहिती दिलेली नाही. सर्व साक्षीदारांनी आरोपींसोबत पूर्वीपासून वाद असल्याचे मान्य केले आहे. त्यामुळे त्यांच्या साक्षीवर संशय निर्माण होतो. पंच साक्षीदार (अ.सा.क्र.१ व ३) यांनी जप्तीबाबत कोणतीही ठोस माहिती दिलेली नाही. त्यांनी केवळ पंचनाम्यावर सही केल्याचे सांगितले आहे. जप्त केलेल्या काठ्या सदर गुन्ह्याशी संबंधित असल्याचे सिद्ध झालेले नाही. साक्षीदार (अ.सा.क्र.२) यांनीही घटनेबाबत काहीही माहिती नसल्याचे सांगितले आहे. तपास अधिकारी यांनी देखील प्रस्तुत गुन्हयाच्या अनुषंगाने आरोपींना दोषी धरण्याइतपत प्रकाश टाकलेला नाही. त्यामुळे अभियोग पक्षाला स्वतंत्र व निष्पक्ष साक्षीदारांचा आधार मिळत नाही. सबब, आरोपी हे संशयाचा फायदा मिळून निर्दोष होण्यास पात्र ठरतात. सबब, वरील सर्व विश्लेषणात्मक कारणांसाठी मुद्दे क्रमाक १ ते ४ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र. ५ साठी पुढील आदेश पारित करण्यात येत आहे.

## आ दे श

| | |
|---|---|
| १ | आरोपी क्र. २ **प्रमोद ताराचंद सोनवाने** व आरोपी क्र. ३ **कमलाबाई ताराचंद सोनवाने** यांची फौजदारी प्रक्रीया संहिता कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड |

| | |
|---|---|
| | विधानाचे कलम ४५२, ३२४, ५०६, ५०९ सह ३४ वरील दंडनीय अपराधातुन निर्दोष मुक्तता करण्यात येते. |
| २ | प्रस्तुत प्रकरण हे प्रलंबित असतांना आरोपी क्र. १ संजय ताराचंद सोनवाने हे मयत झालेले असल्यामुळे त्यांचे विरूध्द प्रकरण अबेट करण्यात आलेले आहे. |
| ३ | आरोपींचे जामिन कदबे व जात मुचलके रद्द करण्यात येतात. |
| ४ | आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ प्रमाणे पूर्तता करणेकामी प्रत्येकी रुपये १५,०००/– चे अपील कालावधी पर्यन्त वैयक्तिक बंधपत्र लिहून द्यावे. |
| ५ | गुन्हयातील जप्त मुद्देमाल क्र. ७३/२०१८ एक आडजातीची काठी व एक बांबुची काठी मूल्यहीन असल्यामुळे अपील कालावधी नंतर नियमाप्रमाणे नष्ट करण्यात यावा. |
| (न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला). | |

Digitally signed by PRIYANKA MACHINDRA KAJALE
Date: 2026.03.18 18:17:11 +0530

**ठिकाण – सडक अर्जुनी.**
**दिनांक – १८.०३.२०२६**

**(पी. एम. काजळे)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग**
**सडक अर्जुनी.**

**<u>दाखला</u>**

दाखला देण्यात येतो की, सदर पी.डी.एफ. फाईलमधील मजकुर हा मुळ आदेश/न्यायनिर्णयाप्रमाणेच आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – | राहुल दिगंबर भुजाडे<br>लघुलेखक (श्रेणी–३), |
| न्यायालयाचे नाव | – | दिवाणी व फौजदारी न्यायालय, सडक अर्जुनी, |
| आदेश/न्यायनिर्णय जाहीर केल्याचा दिनांक | – | १८.०३.२०२६ |
| मा. पिठासिन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याचा दिनांक | – | १८.०३.२०२६ |
| आदेश/न्यायनिर्णय अपलोड केल्याचा दिनांक | – | १८.०३.२०२६ |